■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३१६ ■ रविवार दि.३ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 316 ■ Sunday Dt. 3 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# सपोनि मनोज निलंगेकर गार झोपलेत, पण तलवाड्यात गुन्हेगार जागेच, काय चाललंय नेमकं, जबाबदारी कोणाची आहे?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक

महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## मुलांच्या वडिलांचा थेट आरोप! पोलिस प्रशासन कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष?

# एसपी साहेब, तलवाडा पोलीस ठाण्याकडे जातीने लक्ष घालून पत्त्याच्या क्लबवर सिंघम स्टाईल कारवाई करा?

## खुनाच्या गुन्ह्यातील जामिनावर सुटलेले आरोपी तलवाड्यात पत्त्याचे क्लब चालवून अनेकांचे संसार उद्ध्वस्त करू लागले?



**तलवाडा । प्रतिनिधी**

**तलवाड्यात बिनधास्तपणे सुरू असलेल्या पत्त्याच्या क्लबमुळे अनेक तरुणांचे आयुष्य अंधारात लोटले जात असून, या अवैध क्लबवर पोलिसांकडून अद्याप ठोस कारवाई झाली नाही, ही बाब अत्यंत धक्कादायक आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी एसपी नवनीत कॉवत यांच्याकडे विशेष लक्ष घालून सिंघम स्टाईल कारवाईची मागणी केली आहे. तलवाडा याठिकाणी हॉटेल वर अवैध पत्त्यांचे क्लब चालवून परिसरात आम्ही किती वरचढ आहोत हे दाखवण्याच्या नादात एक निष्पाप तरुणाला बेदम मारहाण करत त्याचा खून करण्यात आला होता. यातील आरोपी कित्येक दिवस गावात नव्हते त्यांच्या जामीन नव्हत्या परंतु मा.न्यायालयाने जामीन देऊन त्यांना एक संधी दिली आहे परंतु त्यांच्या अंगातली गुन्हेगारी प्रवृती जाता जात नसून साध्य त्यांनी तलवाडा येते पुन्हा शासनाच्या निमानुसार चालवण्यात येणारे परंतु प्रत्यक्षात कोणताही नियम न पाळता चालवणारे क्लब सुरू केले आहेत. यामुळे यांची गुन्हेगारी प्रवृती अधिक बळावत जात असून याला पोलिस प्रशासनातील अधिकारी पायबंद घालतील का याकडे तलवाडा आणि परिसरातील जनता पाहत आहे.**



पोइतांडा येथील युवक रामेश्वर राठोड याला प्रेम प्रकरणाचा संशयावरून हॉटेल त्रिमृती याठिकाणी अमानुष मारहाण करण्यात आली होती, ही मारहाण झाली तेव्हा ही याच ठिकाणी अवैध पत्त्यांचे क्लब हप्ते देऊन सर्रास सुरू होते. या वेळी याठिकाणी कोणी प्रतिबंधात्मक कार्यवाही केली नसल्यामुळे हे क्लब चालवणाऱ्याची मुजोरी वाढली होती आणि आमचे कोणीच काही करू शकत नाही असे यांच्या अंगात अहंकार निर्माण झाला होता. आम्ही क्लब चालवत असून आम्ही पैशाच्या जोरावर काही ही करू असा समज या मारेकऱ्यांचा असावा. परंतु कायद्या पुढे कोणी मोठा नाही आणि कोणी छोटा नाही न्याय व्यवस्था ही सर्वासाठी समान असल्याने यातील सर्व आरोपी न्यायालयाच्या आदेशानुसार कायदेशीर शिक्षा भोगून जामिनावर सुटलेले आहेत. यांनी जामिनावर बाहेर आल्यानंतर कोणतेही बेकायदेशीर कृत्य करून नये, कोणतेही अवैध धंदे करू नये, केस चा निकाल लागेपर्यंत कोणालाही धमकी देणे, शिवीगाळ करणे, कोणाच्या मारहाणीचा कट रचणे, जिवती हानी करणे असे कृत्य करण्यास बंदी असते. परंतु पोइतांडा येथील मयत मुलाचे वडील राठोड यांनी तलवाडा पोलिस ठाण्यात

▶ पान २ वर



### तलवाडा च्या उपसरपंचाने तीन महिन्यापूर्वी निवेदन दिले असता अजूनही कारवाई नाही

तलवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी खुले आम पत्त्या चे क्लब मनोरंजन च्या नावाखाली चालू असून पण त्याचे क्लब चालवणारे दोन नंबर वाले गुन्हेगारी वृत्तीचे लोक असून सुशिक्षित बेरोजगार अशा क्लब वर जाऊन आपल्या संसाराची राख रांगोळी करत असुन याचा लोकांनी फायदा घेऊन आड माफ पैसे कमवत आहेत या वर तलवाडा पोलीस धाक राहिला नसुन गावात बरेच ठिकाणी अवैध धंदे वाढले असून दारू ठिकठाणी मिळत असून तलवाडा गाव बिहार मध्ये असल्या गत वाटत आहे व त्याच्या क्लब कारवाई करण्यासाठी गावचे उप सरपंच अक्रोड सौदागर यांनी तीन ते चार महिन्यापूर्वी नावासहित निवेदन दिले होते मात्र कारवाई अद्याप पर्यंत झालेले दिसून येत नाही याकडे आता स्वतः बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जातीने लक्ष देऊन तलवाडा गाव पत्ते क्लब असे अनेक धंद्यापासून मुक्त करण्याची मागणी होत असताना दिसून येत आहे.

### परळी–सिरसाळा रस्त्यावर भीषण अपघात : ट्रक मालकाचा जागीच मृत्यू

**परळी । प्रतिनिधी**

परळी–सिरसाळा रस्त्यावर शुक्रवारी (दि. १) रात्री साडेअकराच्या सुमारास कार व ट्रक यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रक मालक सय्यद मगदुम सय्यद जफर (वय ४५, रा. पेठ मोहल्ला, परळी वैजनाथ) यांचा जागीच मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, सय्यद मगदुम हे आपल्या ट्रकचा पंक्चर झालेला टायर बदलण्यासाठी सिरसाळा जवळील रस्त्याच्या कडेला उभे होते. दरम्यान, भरधाव वेगाने येणाऱ्या स्विफ्ट डिझायर कारने त्यांना जोरदार धडक दिली. धडक एवढी जबरदस्त होती की, घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला.

स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत त्यांना परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच रुग्णालयात नातेवाईक, परिचित आणि नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, अपघात घडवणारी कार पोलिसांनी ताब्यात घेतली असून पुढील तपास सिरसाळा पोलीस करत आहेत. या घटनेमुळे परळीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

## गोट्या गिते ९ मिनिटांचा व्हिडिओ काढून आव्हाडांना धमक्या देतोय : आ. रोहित पवार

**बीड । प्रतिनिधी**

महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपी गोट्या गिते याचा एक व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. ८ ते ९ मिनिटांच्या व्हिडीओतून त्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते नेते आ. जितेंद्र आव्हाड यांना धमक्या दिल्या आहेत. अनेक गंभीर आरोप केले. एवढेच नव्हेत तर स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडला दैवत म्हटल्याचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. रेल्वे रुळावर बसून गोट्या ८ ते ९ मिनिटांचा व्हिडीओ काढतोय, धमक्या देतोय, एवढी हिंम्मत या गुंडामध्ये येते कुठून? असा प्रश्न उपस्थित करत गृहमंत्रीसाहेब, उत्तर द्या, असे आव्हान आ. रोहित पवार यांनी मुख्यमंत्री तथा



गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे. या माध्यमातून आ. रोहित पवार यांनी गृहविभागासह बीड जिल्हा पोलिस दलाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहित पवार यांनी फेसबुक पोस्टवरून बीड जिल्हा पोलिस दलासह गृहविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले आहे. महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपी गोट्या गिते याच्या व्हायरल व्हिडीओनंतर त्यांनी ही पोस्ट केली आहे. रेल्वे रुळावर बसून गोट्या गिते व्हिडीओ काढत आहे. तो व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल करत आहेत. तरीही पोलिस यंत्रणा बघ्याची भूमिका कशी घेवू शकते. व्हिडीओतून गोट्या गिते आ. जितेंद्र आव्हाड यांना धमक्या देत असल्याचे दिसून येत आहे. एवढेच नव्हे तर आव्हाड यांच्यासह संदीप, खा. सोनवणे साहेब, अंजली दमानिया यांचेही तो नाव घेत असल्याचे व्हिडीओमध्ये दिसून येत आहे. एवढे असूनही पोलिस अजुनही त्याला अटक करत नाहीत. या गुंडामध्ये एवढी हिंम्मत येते कुठून ? असा प्रश्न आ. रोहित पवारांनी मुख्यमंत्र्यांना केला आहे.

## आष्टीत हॉटेल कामगारांचा संशयास्पद मृत्यू; मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबाचा नकार!

### कुटुंबासह, नातेवाईक पोलिस अधीक्षक कार्यालयात ठाण मांडून

**आष्टी । प्रतिनिधी**

मागील एक महिन्यापासून तालुक्यातील एका हॉटेलवर कामगार म्हणून काम करत असलेल्या कामगारांचा शुक्रवारी सकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान मृत्यू झाला होता. मृत्यू संशयास्पद असल्याने कुटुंबासह, नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यासाठी शनिवारी पोलिस अधिक्षक कार्यालयात ठाण मांडून बसले आहेत.



आष्टी तालुक्यातील खडकत येथील एका हॉटेलवर मागील एक महिन्यापासून जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील धेनटाकळी येथील सिताराम रखमाजी ढवळे (४०) हे कामगार म्हणून कामाला होते. शुक्रवारी सकाळी सहा ते सातच्या दरम्यान त्यांचा हॉटेलवरील वरच्या मजल्यावरून पडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, कुटुंबातील सदस्य व नातेवाईकांनी हा मृत्यू संशयास्पद असून खुनाचा गुन्हा दाखल करावा. तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबातील सदस्य व नातेवाईक बीड येथे पोलिस अधीक्षकांकडे गेले असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणून ठाण मांडून बसले आहेत.

घटनास्थळी आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, पोलिस हवालदार प्रवीण क्षीरसागर, हनुमान घाडगे, भरत गुजर, बिभीषण गुजर, चालक भाग्यवंत यांनी भेट देऊन पंचनामा केला आहे. आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेहावर आष्टी ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून मृतदेह ताब्यात न घेतल्याने आष्टी येथील शवगृहात ठेवण्यात आले आहे.

# सरकारच्या विरोधात चळवळ तीव्र करणार

## शेतकऱ्यांचा किसान सभेच्या कार्यशाळेत सूर

**बीड । प्रतिनिधी**

दिवसेंदिवस शेतकऱ्यांवरील संकटे वाढताना दिसत आहेत. निवडणूकी अगोदर सरकारने आपल्या जाहिरनाम्यात सांगीतले होते की, आम्ही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करू पण अद्याप पर्यंत सरकारने कर्जमाफीचे धोरण हाती घेतलेले नाही. शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे अवजारे, बि–बियाने, औषधे, खते याचे दर भरपूर प्रमाणामध्ये वाढलेले दिसत आहेत. परंतू शेतकऱ्यांच्या मालाला आधारभूत किमत काही मिळत नाही? अश्या अनेक प्रश्नावर महाराष्ट्र राज्य किसान सभा जिल्हा बीडच्या वतीने दि.२ ऑगस्ट २०२५ रोजी शेतकऱ्यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती. यावेळी कॉम्रेड लोकशाहीर, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, कॉम्रेड क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जेष्ठ कामगार नेते कॉ. नामदेव चव्हाण यांचे हस्ते करण्यात आले. शेतकऱ्यांना मागदर्शन करण्यासाठी बार्शीवरुन जेष्ठ कम्यूनिस्ट नेते काँ. तानाजी ठोंबरे आणि महाराष्ट्रराज्य किसान सभेचे राज्य सेक्रेटरी कॉ. आशोक सोनारकर आलेले होते. आपल्या भाषणामध्ये कॉ. ठोंबरे यांनी सांगीतले की, काही पुढारी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चुळवळ करतात, प्रसिध्द होतात आणि निवडणूक आली की, कोणाच्यातरी बगलाला लागुन निवडूण येतात. आमदार होतात, मंत्री होतात पण नंतर ते शेतकऱ्यांच्या बाजूने काहीच बोलत नाहीत. हे काही बरोबर नाहीत. मराठी भाषेचा मुद्धा आता चर्चेत आला. तर या साठी

▶ पान २ वर



# शेतकरी - कुरेशी समाजासाठी हिंदू मुस्लिम ही एकत्र!

## बीडमध्ये सरकारविरोधात संतप्त गर्जना-जनावरं सांभाळा, शेतकरी वाचवा!

## सरकारने तरूणांना बेरोजगार तर शेतकरी व कुरेशींना बेजार केले : खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी व कुरेशी समाजाच्या समस्या आणि मागण्यांसंदर्भात बीड येथील त्रछ फंक्शन हॉलमध्ये पार पडलेली जाहीर सभा सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्ला करत संतप्त घोषणा आणि आक्रोशांनी गाजली. रात्री साडे आठच्या सुमारास पार पडलेल्या या बैठकीस शेकडो मुस्लिम बांधव व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थितांमध्ये आजी-माजी नगराध्यक्ष, आमदार, समाजसेवक, धर्मगुरू व कायद्याच्या क्षेत्रातील मान्यवरांनी ठाम भूमिका मांडली. ही लढाई फक्त धर्माची नाही, तर शेतकऱ्याच्या अस्तित्वाची आणि लोकशाहीच्या रक्षणाची आहे. विविध समाज एकत्र येऊन शांततामय, संविधानिक लढ्याच्या माध्यमातून सरकारसमोर आपली मागणी मांडत आहेत. बीडमध्ये उसळलेला हा आवाज आता राज्यभर पोहोचण्याची शक्यता आहे.



**शेतकऱ्याला उपासमारीला लावणारे गोरक्षक !**

संजय शिंदे सर यांनी स्पष्टपणे सांगितले की, शेतकऱ्याच्या गोठ्यातून जनावरे चोरी जातात आणि गोरक्षक बनलेले व्यापारी उलट शेतकऱ्यांना त्रास देतात. हे गोरक्षक पोलीस संरक्षणात वावरतात. गोरक्षकाची डाल वापरून शेतकरी व चहुजन समाजाला टार्गेट केलं जातं.

**आरएसएसचा डाव, बहुजन समाजावर घाव !**

अजिक्य चांदणे यांनी आरोप केला की, आरएसएसकडून मुस्लिम समाजावर षडयंत्र रचले जात आहे. बहुजन समाजाला अडकवून सरकार हिंदू-मुस्लिमचं राजकारण करतंय. आमदार-खासदार गप्प बसलेत, आता जनता रस्त्यावर उतरणार.

**सरकार गाई जपते, पण शेतकरी उपाशी !**

बबन बडमारे यांचा संतप्त सवाल बुद्धाश्रमात आई-वडील, घरात गाय हेच का सरकारचं हिंदुत्व? आम्ही कांद्याला कांदा लावून लढू, सरकार झुकवूनच थांबू!

**गोवंश बंदीचा परिणाम शेतकऱ्याला मोठा फटका !**

६६ एडवोकेट सय्यद अझहर अली यांनी स्पष्ट केलं की, २०१७ मध्ये गोहत्या बंदीमुळे शेतकरी अडचणीत आला आहे. सुप्रीम कोर्टात याचिका दाखल करू, तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना भेटून निर्णय घेण्याची मागणी करू.

**सत्ता आमची, पण न्याय नाही ?**

८८ फारुख पटेल यांनी सरकारवर जोरदार प्रश्न उपस्थित केला इतर राज्यांत गोमांस सुरु असताना महाराष्ट्रात बंदी का? रातेत असूनहीं कुरेशी समाजावर अन्याय सुरू आहे. याचा जाब सरकारने द्यावा. खुर्शीद आलम- सरकार तरूणांना बेरोजगार करून आता शेतकरी व कुरेशी समाजाच्या मागे लागली आहे.

**पोलिसांचं भूमिकेवर प्रश्नचिन्ह !**

सय्यद आबेद (डज्झक जिल्हाध्यक्ष) यांनी बजरंग दलच्या कार्यकर्त्यांकडून कुरेशी समाजाला होत असलेल्या त्रासावर आवाज उठवला. पोलीस प्रशासन गप्प का? संविधान सर्वांसाठी आहे. अन्याय सहन केला जाणार नाही.

**शेतकरी-कुरेशी एकता हीच लढ्याची दिशा !**

सभा संपताना दिला गेलेला नारा किसान कुरेशी एकता जिंदाबाद जोतल घोषणांमध्ये घुमला. ॲड. शेख शफिक भाऊ यांनी स्पष्ट केलं ही लढाई फक्त मुस्लिम समाजाची नाही, तर बहुजन, शेतकरी, दलितांची आहे. या सरकारने लोकशाहीची थट्टा केली आहे.

**६६ गोरक्षक नव्हे, सरकारचं कट्टर राजकारण जबाबदार**

मौलाना अब्दुल कासमी, मुफ्ती आरिफ साहेब, सय्यद सलीम, मोईन मास्टर, जावेद कुरेशी आदी वक्त्यांनी मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र निषेध केला आणि सर्व समाजाने एकत्र येऊन शांततामय आणि कायदेशीर मार्गाने लढा देण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख हमीद भाई, अकील भाई, हाफेज जमील कुरेशी, खुर्शीद आलम, इरफान भाई व इतर सर्वांनी परिश्रम घेतले. अश्फाक इनामदार, शाहेद भाई, एकबाल मेंबर, सादेख जमा, हफिज इनामदार, शोईब इनामदार, बाबा खान, इलियास मेंबर, शाहेद भाई वगैरे उपस्थित होते.

## श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान

# माजलगाव मठात २४ ऑगस्ट रोजी होणार सांगता

**माजलगाव । प्रतिनिधी**




येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे विद्यमान मठाधिपती श्री.ष ब्र.१०८ श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी श्रावणमासानिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान सुरू केले आहे. दरम्यान, श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे चतुर्थ अनुष्ठान आहे. दरम्यान, माजलगाव मठात रविवार, २४ ऑगस्ट रोजी सांगता होणार असून याप्रसंगी महापूजा आणि तीर्थप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.

पवित्र श्रावणमासानिमित्त श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान सुरू केले आहे. अध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रात श्रावणमास अनुष्ठानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी समस्त जणांच्या कल्याणासाठी दिव्य अनुष्ठान व तपश्चर्या केली, देशातील १२ ज्योतिर्लिंग आणि नेपाळमधील पशुपतीनाथ, हिमालयात अनुष्ठान करून आपले वेगळे स्थान केले. याच विचाराचे संस्कार घेऊन विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज समर्थपणे वारसा चालवित आहेत. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील श्रावणमास अनुष्ठानाचे हे चतुर्थ वर्ष आहे. यावर्षी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथे अनुष्ठान सुरू केले आहे. अनुष्ठानाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रीपार्वतीमाता अन्नछत्र (कपिलधार) च्या वतीने अन्नदान सुरू आहे. विजयकुमार मुसळे, मल्लिकार्जुनआप्पा आगरे, महादेव स्वामी हे भाविकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. श्रावणमास अनुष्ठानाची सांगता रविवार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगाव येथे होणार आहे. त्याअनुषंगाने महापूजा आणि तीर्थप्रसादाचे आयोजन केले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.

**'तपोरत्नांच्या आदर्श मूल्यांची जपवणूक करणार'**

श्रावणमास अनुष्ठान ही खडतर तपश्चर्या आहे. शिवैक्य तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी दाखविलेल्या मार्गावरून चालण्याचा ध्यास घेतलेला आहे. अध्यात्मिक क्षेत्रातील तपोरत्नांचे आदर्श मूल्य जपण्याचा सदैव प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याची माहिती विद्यमान मठाधिपती श्री.ष ब्र.१०८ श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.



शोषितांचा आक्रोश शब्दातुन मांडणारे थोर समाजसुधारक, प्रतिभावंत लेखक, कवी, साहित्यरत्न. लोकशाहीर, डॉ. आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी टाकरवन येथील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती. अशा या थोर समाजसेवक, लोककवी व लेखकास विनम्र अभिवादन.

# अमान हनीफ शेख ची तस्मयख़्वानी (बिस्मिल्लाह) विधिवत साजरी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील जव्हेरी गल्ली भागात राहणारे हनीफ़ शरीफ़ शेख यांचा मुलगा अमान हनीफ़ शेख ची तस्मयख़्वानी (बिस्मिल्लाह) विधिवत साजरी करण्यात आली. यावेळी सर्व नातलग आणि मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इस्लाम धर्मात मुले-मुली जेव्हा चार वर्ष, चार महिने आणि चार दिवस वयाचे होतात तेव्हा त्यांची तस्मयख़्वानी (बिस्मिल्लाह) विधिवत साजरी केली जाते. यात पवित्र कुरआन मधील सुर-ए-फ़ातेहा चे पठण करविण्यात येते. येथून प्रथम ख़ायदा (अलम) आणि नंतर कुरआन पठण शिकविले जाते. अशाच प्रकारे अमान ची तस्मयख़्वानी (बिस्मिल्लाह) साजरी करण्यात आली.



अमान ने आपल्या खणखणीत आवाजात सुर-ए-फातेहा चे पठण केले. यावेळी त्याच्या अम्मी-अब्बू सह दादा-दादी, चुलत दादा-दादी, फुप्पू-फुप्पा, सर्व चाचा-चाची, सर्व बहिण-भावंडे, सर्व नातलग आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वांनी अमान चे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सरपंच व ग्रामसेवक यांच्या अथक परिश्रमाने पात्रुड येथे आर्थिक साक्षर मेळावा संपन्न

## स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना समजावून सांगितले विम्याचे महत्त्व

**पात्रुड । प्रतिनिधी**

तालुक्यातील पात्रूड गावचे सरपंच नौशाद लतीफ मोमीन, व ग्रामविकास अधिकारी भागवत भुजबळ, यांच्या अथक परिश्रमामुळे व पाठपुराव्यामुळे पात्रुड गावामध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या वतीने शेतकरी कष्टकरी मजूर भूमिहीन यांच्यासाठी सरकारी योजनेचा संयुक्त असा आर्थिक साक्षर मेळावा मोठ्या उत्साहात व बहुसंख्य गावकऱ्यांच्या उपस्थितीथी मध्ये संपन्न झाला.



मेळाव्याच्या माध्यमातून रिझर्व बँक ऑफ इंडिया चे वरिष्ठ अधिकारी व बीड रोड माजलगाव शाखेच्या मॅनेजर यांनी गावकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमध्ये सेविंग खातं उघडल्यानंतर त्याचे काय फायदे असतात आणि वीस रुपयांमध्ये अपघात विमा विविध प्रकारच्या शासनाच्या योजना यावेळी गावकऱ्यांना समजून सांगण्यात आल्या आर्थिक साक्षर मेळावा याचा अर्थ समजावून सांगितला आपण कष्ट करतो मात्र पैशाचं नियोजन आपण व्यवस्थितरित्या करत नसतो पैसा हा कसा बचत केला पाहिजे या विषयावर त्यांनी विविध प्रकारच्या स्कीम गावकऱ्यांना समजून सांगन्यात आल्या. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित पात्रुड गावचे सरपंच नवशात लतीफ भैया मोमीन, ग्रामविकास अधिकारी भागवत भुजबळ, ग्रामपंचायत सदस्य कैलास अलजेंडे, मुव्हीज मोमीन, विलास मामा मोरे, हिशोब भाई सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी व गावातील नागरिक उपस्थित होते.

# जरांगे पाटलांच्या वाढदिवसानिमित्त गरजूंना सायकलचे वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठ्यांच्या गळ्यातील ताईत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त होतकरू गरजूंना क्रांती इरिगेशन कडून सायकलीचे वाटप करण्यात आले आहे हे वाटप सामाजिक कार्यकर्ते सुनील ठोसर यांनी केले.



महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील मराठ्यांचा एकमेव दैवत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे नंतर सध्या महाराष्ट्रामध्ये मराठ्यांच्या गळ्यातील ताईत बनलेले मनोज जरांगे यांचा आज वाढदिवस. वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम साजरे करू नयेत. बीड जिल्ह्यातील एका बहिणीवर अन्याय अत्याचार होत असताना मी कसा वाढदिवस साजरा करू, मी वाढदिवस साजरा करणार नाही असे कार्यकर्त्यांना जरांगे पाटील यांनी सांगितले होते. जरांगे पाटलावर प्रेम करणारे महाराष्ट्रातील तरुण व त्यांना मानणारा वर्ग आपापल्या परीने त्यांचा वाढदिवस साजरा करत आहे.

गेवराई शहरातील क्रांति इरिगेशनच्या वतीने शाळकरी मुला मुलींना गोरगरीब होतकरूंना अकरा सायकलचे वाटप इरिगेशनचे संचालक सुनील ठोसर यांनी केले आहे. जरांगे पाटलांना दिर्घ आयुष्य लाभो यानिमित्त प्रार्थना करून गोरगरिबांना होतकरू विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदतिचा हात पुढे करण्यासाठी सुनील ठोसर सारखे पुढे आला असून भविष्यातही होतकरू विद्यार्थ्यांना मदत केली जाईल असे यावेळी त्यांनी सांगितले.

# आंदोलनाचे शास्त्र शिवसैनिकांना कळले पाहिजे, आंदोलन करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे : सुषमाताई अंधारे

## मन-मेंदू-मनगट या सर्वबाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे यांनी आज जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. आगामी निवडणुकी संदर्भात शिवसैनिकांशी सवांद साधला. ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, सामान्य लोकांचे मूलभूत प्रश्न पायदळी तुडवली जातात तेव्हा लोकशाहीला साजेशी आंदोलने झाली पाहिजेत. शिवसैनिकांना आंदोलनाचे शास्त्र कळले पाहिजे, आंदोलन करणे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे यावेळी सुषमा ताई अंधारे यांनी शिवसैनिकांना सांगितले.

जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे कौतुक सुषमाताईंनी केले. जिल्हाप्रमुख पदाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती घेतली. शिवसैनिक व जिल्हाप्रमुख म्हणून मन - मेंदू - मनगट या सर्व बाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण असल्याचे ताईंनी सांगितले. दर वेळी हमारीतुंबरी वर येऊन शिवसैनिकांनी काम न करण्याचा सल्ला ही शिवसैनिकांना या वेळी सुषमा ताई अंधारे यांनी दिला.

नळ - गटार - रस्ते या तीन कामावर लक्ष केंद्रित करून आंदोलने करा. या पूर्वी संपूर्ण मराठवाड्यात आपण पाणी प्रश्नावर आंदोलने केली यांची दखल या सरकारला घ्यावी लागली असल्याचे ताई म्हणाल्या. यावेळी जिल्हाप्रमुखासह शिसैनिकांनी ताईचा आदर सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी पं. स. विलास महाराज शिंदे, महिला संघटिका मीराताई नवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन धांडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडकर, तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, कामगार सेनेचे रवि वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, गणेश लोणकर, राजाभाऊ हुरकुडे, दादा साहेब सोनवणे, सतीश परदेशीं, दिलीप पवार आदी उपस्थित होते.



# गोरक्षनाथ टेकडी येथे संत महंतांच्या हस्ते सप्ताह सुरूवात



**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ पुण्यमारणार्थी महंत गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहचा आरंभ शनिवारी सकाळी ११ वाजता संत महंतांच्या हस्ते दीप प्रज्वलन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री. महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर व गोपाळ महाराज शास्त्री करण्यात आले. गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या हस्ते विधिवत गुरू पूजा करुन सप्ताहाची सुरूवात करण्यात आली. यावेळे परिसर भक्तीमय झाला.

गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज, तपोनिधी महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर, गोपाळ महाराज शास्त्री, आखाडानंद महाराज शास्त्री भवानी गड, वसंत महाराज लोळदगाव, जानकीराम महाराज घुमरे मैदा श्रीहरी महाराज पवार संत ज्ञानेश्वर माऊली बेदरकर, महादेव महाराज भारती, बाबुराव महाराज मुंडे आदी महंतांच्या हस्ते कलश स्थापना, कलश पूजन, गुरू पूजन, करण्यात आले. सर्व महंतांच्या हस्ते पुष्प फुले अर्पण करून अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात करण्यात आली. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये संपुर्ण सप्ताह कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, अशा कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी परिसर भक्तिमय झाला आहे. यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी परिसरातील असंख्य भाविक भक्तांना उपस्थित होते.

पान १ वरून...

## एसपी साहेब, तलवाडा पोलीस ठाण्याकडे जातीने लक्ष घालून पत्त्याच्या क्लबवर सिंघम स्टाईल करा?

तक्रार दाखल केली असून या तक्रारीत म्हटले आहे की आरोपी हा आम्हाला धमक्या देतो, शिव्या देतो, पत्त्यांचे क्लब चालवतो, यांच्यापासून धोका आहे यास तत्काळ अटक करावी अशी मागणी केली आहे.ही मागणी किती खरी आणि किती खोटी हे पोलिस प्रशासनाच्या तपासणीत समोर येईल परंतु हा आरोपी प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्ष तलवाडा येथील नियमानुसार दिसणाऱ्या परंतु कोणतेही नियम आणि अटी नुसार न चालवण्यात येणाऱ्या पत्त्यांचे कल्ब याठिकाणी राजरोजपणे वावरत असून खेळताना दिसतो, त्याच बरोबर याच गुन्ह्यात असणारे इतर आरोपी ही याच खेळात पैसे कमावण्याच्या नादात असून यांना पुन्हा एकदा गुन्हेगारी जगतात मोठे करायचे आहे का असा प्रश्न उपस्थित होतो. याप्रकरणी तलवाडा पोलिस प्रशासन काय भूमिका घेणार हे पाहणे योग्य ठरणार आहे.

## सरकारच्या विरोधात चळवळ तीव्र करणार

आपल्याल कॉम्रेड ऑण्णाभाऊं, कॉम्रेड क्रांतीसिंह नाना पाटील, आमरशेख, गव्हाणकर यांचा अभिमान पाहिजे. कांदबऱ्या, लावण्या छक्कड, पोवाडे लेहून आणाभाऊनी मराठी सातसमुद्रापार पाठवली, नानापाटनांनी लोकसभेच्या संसदेत देशात पहिल्यांदा मराठीत भाषांतर केलं. हे सर्व शेतकऱ्यांनी लक्षात घेऊन सर्वांना सांगायला हवं. स्वातंत्र्य भारतात नाना पाटलांनी सर्वप्रथम शेतकऱ्यांचे नाला बेडींगचे कर्ज सरकारला माफ करायला लावल. 'कर्ज फिटल म्हणा' अशी घोषणाच दिली. अशा क्रांतीकारकाच्या विचाराचे आपण वारसदार आहोत. त्यामुळे आपण किसानसभा या संघटनेचे हात बाळकट करून कर्जमाफीसाठी सरकारला सळोकी पळो करून सोडण्याचा निर्धार आपण करूयात.

किसान सभेचे राज्य सेक्रेटरी कॉ. अशोक सोनारकर म्हणाले की, मराठवाडा आणि विदर्भात या वर्षात शेतकरी आत्महत्तेचे प्रमाण वाढलेलेआहे. याला सर्वस्वी सरकार जबाबदार आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे केंद्र सरकार आणि राज्य सरकार डोळेझाक करत आहे. परंतु किसान सभा शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देऊन त्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडून, त्यांच्या समस्या सोडवण्यास आम्ही कटिबध्द आहे. ट्रम्प याने भारतावर जाचक निबंध लादलेले आहेत. आपल्या मालाला निर्यातीवर त्याने २५% कर लावलेला आहे. त्यासाठी किसान सभा पूर्ण भारतभर १३ ऑगस्ट दिवशी ट्रम्पचा पुतळा जाळून त्याचा निषेध करणार आहे.

या प्रसंगी मंचावर किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. डि. जी तांदळे, बार्शीचे बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. ए. बी. कुलकर्णी उपस्थित होते. भाकप चे जिल्हा सचिव कॉ. भाऊराव प्रभाळे आणि कीसान सभेचे जेष्ठ नेते को महादेव नागरगोजे यांनी. कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कॉम्रेड क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार भेटल्याबद्दल राजकुमार कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जिल्हयातील बीड, गेवराई, पाटोदा, वडवणी, शिरूर, केज, या तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते. कॉ. नितीन जायभाये, सामाजिक कार्यकर्ते संगमेश्वर आंधळकर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश मस्के, हिंदोळे पाटील, उपसरपंच सुधाकर डोळस, व्याख्याते परमेश्वर बन्कर आदि उपस्थित होते. आसाराम मुळे, आश्रुबा आखाडे, आण्णासाहेब चाळक, आरुण कानडे, विजय कुटे, संतोष काळे, आत्माराम राख, दगडू यादव, वाळेकर, बी.एस. दहीवाडे, विनोद सवासे आदिंनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन आणि आभार किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. ज्योतीराम हुरकुडे यांनी केले.

# महिला दक्षता समिती प्रमाणे पुरुष दक्षता समिती राज्यात स्थापन करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुविद्य पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री अमृता फडणवीस यांना आश्रय सेवा केंद्राच्या वतीने निवेदन : शेख आयेशा

**मुंबई । प्रतिनिधी**

महिलांवर अत्याचार झाला तर त्यांना न्याय देण्यासाठी संपूर्ण राज्यभरात पोलिस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती कार्यरत आहे. त्यामुळे पीडित महिलांना न्याय मिळतो. मात्र जे पुरुष स्त्रियांच्या त्रासापासून त्रस्त झालेले आहेत त्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुरुष दक्षता समिती स्थापन करावी अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण करावी अशी मागणी आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा शेख आयेशा यांनी प्रत्यक्ष भेटून केली आहे. या भेटी मध्ये त्यांनी बऱ्याच वेळ विविध विषयावर सविस्तर सकारात्मक चर्चा केली.

महाराष्ट्रामध्ये महिलांवर अत्याचार होतात. या अत्याचारांना न्याय मिळावा पिढीताना त्रासापासून मुक्तता मिळावी. यासाठी राज्यभरामध्ये पोलीस स्टेशन अंतर्गत महिला दक्षता समिती गठीत करण्यात आलेली आहे. मात्र महाराष्ट्रामध्ये महिलांकडून पुरुषांवर होणारे अत्याचार सुद्धा कमी नाहीत. अशा पीडित पुरुषांना न्याय मिळावा यासाठी राज्यातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत पुरुष दक्षता समिती गठीत करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोलीस महासंचालक रश्मी शुक्लाजी यांना निवेदन देऊन आश्रय सेवा केंद्राच्या वतीने केली आहे. या मागणीला न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्र्यांकडे साकडे घालावे आणि राज्यातील पीडित पुरुषांना न्याय द्यावा अशी मागणी प्रसिद्ध सुमधुर गायिका, उत्कृष्ठ अभिनेत्री तथा समाजसेविका अमृता फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून केली असल्याचे पत्रकार तथा आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्ष शेख आयेशा यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.




### अमृता फडणवीस यांची नम्रता अमृताहुनही गोड जाणवली...

महाराष्ट्राचे लोकप्रिय आणि चाणाक्ष मुख्यमंत्री म्हणून ज्यांची जगभर ख्याती आहे अशा देवाभाऊंची सुविध पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री, सुमधुर गायिका, सामाजिक कार्यकर्त्यां अमृता फडणवीस यांनी केवळ भ्रमणध्वनीवर झालेल्या मैत्रीला जागून प्रत्यक्ष मुंबईत भेटीसाठी आमंत्रित केले. प्रत्यक्ष भेटी दरम्यान त्यांनी मोठ्या अज्बीने म्हणाल्या, बीडवरून मला खास भेटण्यासाठी आलेल्या त्या आयेशा कुठे आहेत, असे आपल्या सिक्युरिटी गार्डला विचारत त्यांनी सर्व प्रोटोकॉल बाजूला ठेवून प्रत्यक्ष भेट घेतली. विविध विषयावर बाजूला खुर्ची टाकून सविस्तर बराच वेळ मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि पुन्हा आपण भेटत राहू. तुमच्याशी भेटून गप्पा मारू खूप चांगले वाटले. अशी भावना व्यक्त केली. त्यांच्यामध्ये असलेली माणुसकी, आपलेपणा हा अमृताहुनी गोड जाणवला. भेटीचा हा क्षण अविस्मरणीय ठरला.

## बीड लहुजी शक्ती सेना महिला जिल्हाध्यक्ष व राज्य कार्यकारणी सदस्य यांना राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ जाहीर

**बीड । प्रतिनिधी**





साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त, सार्वजनिक जयंती उत्सव, समिती २०२५ नवी दिल्ली यांच्या वतीने देण्यात येणार असून, अत्यंत मानाचा व प्रतिष्ठेचा गौरव पुरस्कार देणार आहेत. लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष प्रियंका ताई लांडगे व तसेच सामाजिक चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांना जाहीर झाला असून, सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव कामगिरीची दखल घेऊन यावर्षी गौरव पुरस्कार त्यांना प्रधान करण्यात येणार आहे.

दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी इंडिया गेट जवळ नवीन महाराष्ट्र सदर नवी दिल्ली येथे होणाऱ्या भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये हा पुरस्कार वितरण केंद्रीय मंत्री व साधुसंत मंत तसेच जाहीर स्वयंसेवक संघाचे निलेश गद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार असल्याचे जयंती समितीचे अध्यक्ष विनोद धर्म जाधव यांनी सांगितले. हा पुरस्कार वितरण सोहळा दि.५ ऑगस्ट २०२५ महाराष्ट्र सदन इंडिया गेट नवी दिल्ली येथे होणार आहे.

## आनेगावच्या जिल्हा परिषद शाळेने गुणवंत विद्यार्थी घडवून आदर्श निर्माण केला : मुजमुले

**स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ उत्साहात संपन्न**

**केज । प्रतिनिधी**



शालेय जीवनातील महत्त्वाचा टप्पा आणि विद्यार्थ्यांचा भावी वाटचालीची दिशा ठरविणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील एम टी एस या स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री. पौळ, प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार दत्तात्रय मुजमुले, सेवानिवृत्त शिक्षक कविदास हांडीबाग, रामराव इंगळे, सुर्यकांत जाधव, जालिंदर इंगळे उपस्थित होते.

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अनेक यशोशिखरे गाठता येतात. जिद्द आणि कष्ट याला मार्गदर्शनाची साथ मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो असे शाळेचे उपक्रमशील शिक्षक जयराम मांगडे बोलताना सांगितले. आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतून एम टी एस.या शासनाच्या मान्यता प्राप्त स्पर्धा परीक्षेसाठी १० विद्यार्थी परीक्षेस सामोरे गेले होते. त्यातील आठ विद्यार्थ्यांनी गोल्ड आणि सिल्वर मेडल पटकावले आहे. आशिष सूर्यकांत जाधव, समर्थ अशोक हंडिबाग, अपेक्षा सिद्धाम हंडिबाग, ज्योती रामराव इंगळे, शंभुराजे रजनीकांत हंडिबाग, आरोही अशोक हंडिबाग अविष्कार अशोक इंगळे, ईशाणी धैर्यशील इंगळे, रुद्र बळीराम शिकारे, नंदिणी व्यंकट इंगळे आदी विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल आणि सिल्वर मेडल पटकावले होते. त्यांचा मेडल, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि जिल्हा परिषदेच्या शाळा इतर शाळेपेक्षा कमी नाहीत हे आनेगाव येथील जिल्हा परिषद शाळेने दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करत या शाळेतील उपक्रमशील शिक्षकांनी शाळेची वेगळी ओळख निर्माण करत जिल्हा परिषद शाळेचा दर्जा उंचावला असल्याचे मत पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांनी बोलताना व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक जयराम मांगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन ट्रेनी शिक्षक पूनम इंगळे यांनी केले. यावेळी गावातील नागरिक माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथे पतसंस्था संचालक, कर्मचारी प्रशिक्षण संपन्न

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म पुणे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था बीड, सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांच्या वतीने अंबाजोगाई येथे दोन दिवसीय पतसंस्था संचालक, कर्मचारी प्रशिक्षण घेण्यात आले. सदर प्रशिक्षणात जे.एस.शर्मा वसुंधरा महिला नागरी सहकारी बँक, अंबाजोगाई सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर चे उप प्राचार्य एस.आर.कोळे, आधार मल्टी स्टेट पतसंस्थेचे संस्थापक सुनिल सौंदरमल, सी.ए.खोडसे प्रमाणीत लेखा परीक्षक सहकारी संस्था बीड यांनी योग्य कर्ज वाटप, वसूली संबंधी कायद्यातील तरतुदी, नियामक मंडळ, व्यवसाय वाढ, सहकार कायद्यातील महत्वाच्या तरतुदी, पतसंस्था ऑडिट गुण निकष, उपविधी दुरूस्ती, नफा विभागणी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्र संचलन व आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस.आर.कोळे उप प्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.



## कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने स्व.मोहम्मद रफी पुण्यतिथी निमित्त गायन स्पर्धा उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**




दिनांक ३१ जुलै रोजी स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथीनिमित्त केज येथील कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या स्व. मोहम्मद रफी यांच्या पुण्यतिथी निमित्त गीत गायन स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, भाई मोहन गुंड, शिवाजीदादा ठोंबरे, शाहीर तुकाराम ठोंबरे, ज्येष्ठ समाजसेवक हनुमंत भोसले, आरपीआय तालुका अध्यक्ष दीपक कांबळे, पत्रकार चंद्रकांत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लाभलेले लातूर येथील चंद्रशेखर पारशेट्टी, बीड येथील सुरेश थोरात सर, सचिन राऊत सर, पुरोगामी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रंजीत घाडगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई केज तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, वसंत सोनवणे, दिनकर जाधव, अमोल सावंत या मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली. स्पर्धेला नागरिकांतून व स्पर्धका मधुन मोठा प्रतिसाद होता. या स्पर्धेसाठी बऱ्याच ठिकाणाहून स्पर्धक आले होते तर या स्पर्धेत होणारे गीत ऐकण्या करिता भरपूर संख्यांनी रसिक श्रोते उपस्थित होते.ही स्पर्धा स्त्री व पुरुष गटामध्ये घेण्यात आली. यामध्ये एकूण ५४ स्पर्धक होते. १७ महिला व ३७ पुरुष यांनी सहभाग घेतला होता. पुरुष स्पर्धकांनी स्व.मोहम्मद रफी यांचे गीत गायले व महिलांनी स्व.भारतरत्न लता दिदी मंगेशकर व इतर गायिकांचे गाणे गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले.

या स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक लातूर येथील किशोर कांबळे, द्वितीय बक्षीस महेश, तोष्णीवाल तृतीय बक्षीस सुदर्शन शिंदे व उत्तेजनार्थ जनार्दन वडमारे यांनी पटकावले व महिलांमध्ये प्रथम बक्षीस संभाजीनगर येथील दिपाली हरणे, द्वितीय बक्षीस ललिता लांडगे, तृतीय बक्षीस सुरेखा थोटे व उत्तेजनार्थ दीक्षा कांबळे यांनी पटकावले. या कार्यक्रमाची प्रस्तावना कला क्रीडाविश्व समिती चे तालुका अध्यक्ष अनिल वैरागे यांनी केली व आभार उपाध्यक्ष मुनीर कुरेशी यांनी मानले. या स्पर्धेसाठी कला क्रीडा विश्व समितीचे सचिव सचिन लांडगे, बलभीम मस्के, शिवमुर्ती हजारे, कल्याण मस्के, दिलीप खाडे, अमोल सरवदे, ज्ञानेश्वर लांब, सिंधू मुळे, अनिता कसबे, छबू अंधारे या पदाधिकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले.

## जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत वकृत्व स्पर्धेचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चौसाळा शाळेत लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी निमित्त वकृत्व स्पर्धा चे आयोजन इयत्ता नववीचे वर्ग शिक्षक विजय कोळेकर व विद्यार्थ्यांनी केले, वकृत्व स्पर्धेमध्ये लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्रातील चळवळीचे योगदान, व बाळ गंगाधर टिळक भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान हे विषय वकृत्व स्पर्धेसाठी ठेवण्यात आले होते. यामध्ये पहिली ते दहावी असे एकूण तीन गट गटात स्पर्धा घेण्यात आले. छोटा गट पहिली ते चौथी, दुसरा गट पाचवी ते सातवी व मोठा गट आठवी ते दहावी यामध्ये वकृत्व स्पर्धेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी पायल नाईक व कुमारी प्रतिज्ञा गजरे यांनी केले तर प्रास्ताविक सिद्धी जोगदंड तर आभार प्रदर्शन अंजली तांदळे व सृष्टी नागरगोजे या मुलींनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजी हांम्पे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षक श्री सुभाष काकड श्रीमती शालिनी काकडे तर सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत हे होते कार्यक्रमाची सुरुवात ही अध्यक्षाच्या हस्ते प्रतिमा पूजनाने करण्यात आली व त्यानंतर वकृत्व स्पर्धेला सुरुवात झाली. यामध्ये प्रथम गटांमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेले विद्यार्थी तेजश्री महादेव काटवटे इ ४ थी, द्वितीय क्रमांक प्रियल नितीन शिंदे इ २ री, तृतीय क्रमांक तनुजा अतुल शिंदे इ २ री, दुसऱ्या गट ५ वी ते ७वी तून प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थी राजवैभव राहुल नाईकवाडे इ ५ वी, द्वितीय क्रमांक प्रांजली रमेश चौरे इ ७ वी, तृतीय क्रमांक तेजश्री केमधरणे ६ वी तर मोठा गट ८ वी ते १० मधून प्रथम क्रमांक मृणाली दीपक विद्यागर १० वी, द्वितीय क्रमांक सलोनी विजय कोळेकर १० वी, तृतीय क्रमांक आदिती अतुल शिंदे ८वी या विद्यार्थ्यांनी वकृत्व स्पर्धेत क्रमांक पटकावले, शिक्षक उद्धव घोडके यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांनी लेखन संस्कृती जोपासावी असे आवाहन केले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून कामकाज पाहिलेले शिक्षक श्रीमती शुभांगी जोशी, शकुंतला तांबडे, वर्षा मोटे, श्री रामचंद्र भोसले, योगानंद गांधले, ज्ञानेश्वर मस्के वैभव शिंदे, शालिनी काकडे, उद्धव घोडके संतोष परतापुरे भागवत नाडे माधुरी इनकर, यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन मुख्याध्यापक श्रीमती पद्मजांपे व सर्व शिक्षक वृंदांच्या वतीने करण्यात आले या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षकांचे सहकारी लाभले.




गेवराई तालुक्यातील मौजे नंदपुर येथे डॉ. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली. यावेळी काशिनाथ अडागळे मा. ग्रा. पं. सदस्य नंदपुर आदी उपस्थित होते.

## चंदनसावरगाव येथे संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथे मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त तसेच संतोष देशमुख व महादेव मुंडे यांच्या स्मृतीप्रत्यिर्थ आयोजित शनिवार दि.२/०८/२०२५ रोजी सकाळी ९ ते दु.२ पर्यंत स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रक्तपेढी, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने स्थळ जि.प.प्रा.शाळा चंदनसावगरगाव येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी अखंड हिंदुस्थानचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन मराठ्यांचे दैवत शिवश्री मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त व स्व.संतोष देशमुख व महादेव मुंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ चंदनसावरगाव गावकरी यांच्या वतीने व जरांगे पाटील समर्थक दिंगबर नाना तपसे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. यावेळी कट्टर शिवसैनिक जरांगे पाटील समर्थक रामहरीजी कोल्हे यांच्या सोबत ४० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी उपस्थित आयोजक दिंगबर नाना तपसे, चंदनसावरगाव सरपंच, युवा नेते रामहरी कोल्हे, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी दादा ठोंबरे, मराठा सेवक योगेश अंबाड, सतिष जाधव, सतिष पटाईत, शशीकांत सपाटे, ओम सपाटे, योगेश भैय्या अंबाड, रामहरी कोल्हे, पत्रकार मनोरम पवार, पत्रकार रोहन गलांडे, अशोक गिराम, मदन तपसे, शत्रगुण तपसे, लक्ष्मीकांत तपसे, संजय तपसे, दत्ता तपसे, सागर शेंडगे उपस्थित होते.



## जगतकर गल्ली येथील सुगंध कुट्टी बुद्ध विहार येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रिकाद्वारे देण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, परळी शहरातील सुगंध कुट्टी बुद्ध विहार येथे काल दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करून अभिवादन करण्यात आले प्रथम पूज्य भंते धम्मसार थेरो यांच्या हस्ते महात्मा गौतम बुद्ध यांची पूजा करण्यात आली असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर माता रमाई यांना पुष्पहार घालून व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची पूजा करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परळीचे माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर, संजय जगतकर, भालचंद्र ताटे, आनंद जगतकर, राहुल जगतकर, राजेभाऊ साळवे, मनोहर वाघमारे इत्यादी सह अनेक जण उपस्थित होते.

## कर्तव्यदक्ष अधिकारी अनिल अहिरे यांची नायब तहसीलदारपदी पदोन्नती

### पत्नीच्या पाठबळामुळे यशाचा टप्पा गाठला : अनिल अहिरे

**धाराशिव । प्रतिनिधी**



कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख सेवेसाठी प्रसिद्ध असलेले अनिल अहिरे यांची नुकतीच नायब तहसीलदार पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. महसुल प्रशासनात कार्यरत असताना त्यांनी कळंब, जागजी, नायगाव व गोविंदपूर या महसूल मंडळांमध्ये अत्यंत जबाबदारीने व निष्ठेने काम केले. त्यांच्या या यशामागे पत्नी सुजाता अनिल अहिरे यांचे मोलाचे सहकार्य असून त्यांनी प्रत्येक टप्प्यावर मानसिक व सामाजिक पाठबळ दिले.

अनिल अहिरे यांना यापूर्वी त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेसाठी चार वेळा कर्तव्यदक्ष मंडळ अधिकारी म्हणून गौरविण्यात आले आहे. कामाच्या ठिकाणी त्यांनी पारदर्शक प्रशासन, जनतेशी संवाद आणि त्वरित सेवा या मूल्यांचा अवलंब केला. त्यामुळेच सहकाऱ्यांमध्ये व स्थानिक नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी आदराचे व विश्वासाचे वातावरण आहे. त्यांच्या या यशाबद्दल जीवन शिक्षण विद्यालय केज व त्यांचे मेव्हणे सहशिक्षक धम्मपाल गायकवाड व परिवार तसेच विविध शासकीय अधिकारी, स्थानिक नेते व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या पदोन्नतीने धाराशिव महसूल विभागात एक सकारात्मक ऊर्जा संचारली आहे.



काशीदवाडी ता.केज येथे दि.०२ ऑगस्ट रोजी अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त ह.भ.प.भगवान महाराज वरपगावकर यांच्या कीर्तनास उपस्थित आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा व सर्व मान्यवर.



## खेर्डावाडी येथे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्सवात साजरी

**टाकरवण । प्रतिनिधी**

सत्यशोधक, थोर समाज सुधारक, साहित्य सम्राट, लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती खेर्डावाडी येथे मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. खेर्डावाडी साठे नगर, या ठिकाणी सत्यशोधक साहित्य सम्राट डॉ.अण्णाभाऊ साठे यांना उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.सत्यशोधक डॉ अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन, करताना उपस्थित अण्णा कादे, रामा देवकुळे, नवनाथ भिसे, बाळू भिसे, अनिल भिसे, गणेश भिसे, कार्तिक भिसे, साहिल भिसे, माऊली भिसे, विकास भिसे, अंकुश भिसे, ज्ञानेश्वर भिसे, राहुल भिसे, अजय भिसे, नामदेव भिसे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गेवराईमध्ये खळबळ! लाखो सोन्यांचा बनावट घोटाळा, चेअरमनच्या पाहुण्याचा समावेश?

## बनावट सोन्यांचा उलगडा न करण्याचे कारण अद्याप गुलदस्त्यात?

**गेवराई । प्रतिनिधी**

फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. दररोज वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. फसवणुकीचे प्रमाण रोखण्यासाठी पोलिसांकडूनही प्रयत्न केले जात आहेत. अशातच आता गेवराई मधून एक मोठी बातमी समोर येत नागरिकांतून ऐकावायास मिळत आहे बनावट सोन्यांच्या व्यापारात सामील व शाखेतील सोने तारण कर्जदार यांना फसवण्यात यशस्वी ठरलेले फरार चेअरमन व त्यांचे लाडके पाहुण्या आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी अद्याप सूत्रे हाती न घेतल्यामुळे संशय व्यक्त होत आहे. गेवराई शहरात सातत्याने गुन्ह्यांच्या घटना दिवसेंदिवस प्रचंड वाढत चालल्या आहेत. त्यातच आता कोल्हेर वेशीच्या आत जाणाऱ्या अवघ्या काही अंतरावर असलेल्या श्री मंगलनाथ मल्टिपल निधी या पतसंस्थेच्या लॉकरमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस येत असल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे याप्रकरणी शाखेचे गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत शेलार इतर या प्रकरणाशी संबंधित असणाऱ्यावर कारवाई करण्याच्या ऐवजी पोलीस प्रशासनाकडून बनावट सोन्यांचा उलगडा न करण्याचे कारण अद्याप गुलदस्त्यात! असल्याची चर्चा आहे.

शाखेचे चेअरमन सह पाहुण्यांच्या साह्याने लढवलेली अनोखी शक्कल ! अखेर.. उघडकीस आल्याने संबंधित टोळीचे धाबे दणाणले आहेत. बनावट सोन्यांच्या पडद्यामागचा किंग कोण? आतापर्यंत किती लोकांना फसवले हे रॅकेट कुठपर्यंत आहे? लॉकरमध्ये बनावट सोने हिरवे पडले मात्र चेअरमन फरार झाल्याच्या नंतरही साखळीत सोबत काम करणारा पाहुणा अडचणीत न येण्यासाठी जूनच्या




शेवटच्या आठवड्यात लाल रंगाच्या गाडीत रातोरात ते सोने पसार करायचा प्रयत्न केला असल्याची चर्चा पाहायला मिळतेय. बनावट नोटा प्रकरणी गेवराई पोलीस स्टेशनचे निरीक्षक प्रवीण कुमार बांगर यांनी केलेली यशस्वीरित्या कारवाई बीड जिल्ह्यात गाजवली मात्र गेवराई शहरात होणाऱ्या बनावट सोन्याबाबत पोलीस प्रशासनाने कुठलीही दखल न घेता चेअरमनसह पाहुण्याला मोकळीक दिली असल्याचे निदर्शनात आलें आहे त्यामुळे खाकीत कर्तव्यदक्ष प्रमाणिक पोलीस अधिकारी व, गुन्हेगारींचा छडा लावणारे निरीक्षक म्हणून कार्यरत असणारे प्रवीणकुमार बांगर यांनी बनावट सोन्यांच्या टोळीचा म्होरक्या शोधत त्याच्या मुस्क्या आवळाव्यात व आर्थिक गुन्हे शाखेच्या अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

### बनावट सोन्यांपासून स्वतःला वाचण्याची पाहुण्याची धडपड

गेवराई शहरात मोठे -मोठे उद्योग व्यवसायात चाललेल्या पारदर्शकता आर्थिक व्यवहारात बनावट नोटा तसेच बनावट सोने करण्याचे गुन्हे वारंवार घडत असल्याचे दिसून येत आहे यामध्ये बनावट सोन्याच्या टोळीत सक्रिय असणाऱ्या प्रशांत शेलारने या प्रकरणातुंन स्वतःला वाचवण्यासाठी धडपड करत माझा आणि शाखेचा काही संबंध नाही असे सांगत न्यायालयीन मार्गाने जाहीर प्रकटन करण्याचा प्रयत्न देखील केला मग शाखेत ठेवलेले खातेदारांच्या नावे सोने या सोन्याचा गोल्ड व्हॅल्युवर कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# विद्यार्थ्यांसमोरच शिक्षक-लिपिकात हाणामारी, शिक्षणाचा झाला तमाशा!

## सीसीटीव्हीमध्ये कैद झालेली धक्कादायक घटना, विद्यार्थ्यांसमोरच झालेला प्रकार, केंद्रप्रमुखांनी घेतली दखल

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील नामांकित सरस्वती प्राथमिक विद्यालयात शुक्रवारी (दि.१ ऑगस्ट) सकाळच्या सत्रात शिक्षक विजय काळे आणि लिपिक प्रदीप शेटे यांच्यात शाळेच्या परिसरातच धक्कादायक स्वरूपाची हातघाई झाली. शिक्षण संस्थेसारख्या पवित्र स्थळी घडलेला हा प्रकार सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. सुरुवातीला केवळ शाब्दिक वाद असलेल्या घटनेने अचानक रौद्ररूप धारण करत हातापायीपर्यंत मजल मारली.

या घटनेची माहिती प्रदीप शेटे यांनी




आपल्या नातेवाईकांना दिल्यानंतर काही तासांतच विजय काळे यांना बोलावून त्यांच्या नातेवाईकांनी गंभीर मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या मारहाणीत विजय काळे जखमी झाले आहेत. शाळेतील काही शिक्षकांनी आणि कर्मचाऱ्यांनी त्यात मध्यस्थी करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांच्या समोरच ही घटना घडल्याने त्यांच्यावर मानसिक परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणात काहीवेळ कोणतीही पोलिस तक्रार दाखल करण्यात आलेली न्हवती मात्र अखेर उशिरा काल दुपारी लिपिकासह पाच जनाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील धारूर पोलीस तपास करत आहेत मात्र शिक्षण विभागाचे केंद्रप्रमुख हक्कीम सय्यद यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी तातडीने शाळेला भेट देऊन प्राथमिक माहिती घेतली असून संबंधित दोघांकडून स्पष्टीकरण मागवले आहे.

या प्रकरणी पुढील शासकीय कारवाईसाठी अहवाल तयार केला जात असून शिक्षण विभाग लवकरच योग्य ती पावले उचलेल अशी माहितीही मिळते. शाळा हे शिक्षणाचं मंदिर असताना, अशा प्रकारच्या घटना संस्थेच्या शिस्तीवर आणि शिक्षक व कर्मचारी वर्गाच्या जबाबदारीवर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण करतात. पालक आणि नागरिकांनीही यावर नाराजी व्यक्त केली आहे.

# तलवाडयात अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. तलवाडा येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला असून याठिकाणी शुक्रवारी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून तलवाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज निलंगेकर उपस्थित होते. सायं. दैनिक आरंभ चे संपादक दिपक दादा थोरात हे देखील जयंती उत्सव कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

यावेळी माजी जि.प. सदस्य ॲड. सुरेश हात्ते माजी जि.प. सदस्य युवराज तात्या डोंगरे, समता परिषदेचे तालुकाध्यक्ष बापू गाडेकर, माजी पं.स.सदस्य श्याम कुंड, विजय डोंगरे सर, विष्णू तात्या हात्ते, बळीराम अण्णा शिंदे, डॉ. आसाराम मराठे, विठ्ठल हात्ते, डॉ. सुरेश बांधले, पत्रकार अल्ताफ कुरेशी, विष्णू राठोड, तुळशीराम बाघमारे शेख खलीलभाई, नजीरभाई कुरेशी, दादाराव रोकडे, मदन हातागळे, धोंडिबा हातागळे, काकुराम



कांबळे, बाबासाहेब आठवले, मदन करडे, संजय हातागळे, बापू रोकडे, वामन रोकडे, संतोष हातागळे यांच्यासह सकल मातंग समाज बांधव, महिला तसेच सर्व जाती धर्मातील नागरिक व विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आवर्जून उपस्थित होते. अतिशय उत्साहात जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला. शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी व मान्यवरांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकून मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश गांधले यांनी तर प्रास्ताविक दादाराव रोकडे यांनी केले. आभारप्रदर्शन ऋषिकेश करडे यांनी केले.

# पिंपरखेड जाम मस्जिद प्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करा

## अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू : सय्यद सलीम बाबू

**बीड । प्रतिनिधी**

मौजे पिंपरखेड तालुका वडवणी येथील जमा मस्जिद प्रकरणी दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी तारिक – ए – इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. पिंपरखेड तालुका वडवणी येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अंतर्गत येणारी महाराष्ट्र शासन राजपत्र अनु.क्र ४५ पान क्रमांक ५४ – ५५ नुसार नोंदणीकृत जामा मस्जिद धार्मिक संपत्ती असून सदरील जामा मस्जिद ही गावातील एकमेव मस्जिद आहे तरी याच गावातील शेख महमूद शेख गफूर, शेख जाफर शेख गफूर, शेख पाशा शेख गफूर, शेखलील शेख गफूर या चौघ भावाने मिळून काही वर्षांपूर्वी मस्जिद पाडून मस्जिद माळवत चे लाकूड,माती व जागा विकण्याचे काम केले होते.



तरी सदरील प्रकरणी मस्जिद खिदमत बहाल यांच्या अर्ज नुसार जिल्हा वक्फ अधिकारी यांनी वेळोवेळी पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे वडवणी यांना वरील गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांचे पत्र क्रं./३७४ /२०१५ दिनांक २१/ ०१/२०१५, जिल्हा वक्फ कार्यालय बीड यांचे पत्र क्रं. एसएनटी/५२७/२०२० दिनांक १३/ १०/२०२० व जा.क्र. वक्फ/एसएनटी विभाग-२५६/४१/२०२४ दिनांक २३/ ०२/२०२४ प्रमाणे पत्रव्यवहार केला होता. तरी सदरील प्रकरणी वरील लोकांवर अद्यापही कसलीही कार्यवाही करण्यात आली नसून वरील गुंड प्रवृत्तीचे लोक हे मस्जिद च्या मालकी संपत्तीवर अवैध प्रकारे कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तरी वरील प्रकरणी गावातील शेख महमूद शेख गफूर, शेख जाफर शेख गफूर, शेख पाशा शेख गफूर, शेखलील शेख गफूर या चौघ भावांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा तारिक – ए – इनाम संघटनेच्या वतीने जिल्ह्यावर तीव्र स्वरूपाचे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे तारिक – ए – इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकात नमूद केली आहे.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या नावाची मुख्याध्यापक व संस्था चालक यांना ऍलर्जी

**बीड । प्रतिनिधी**

आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कुल ही संस्था मौजे दिंदूड ता. माजलगांव जि.बीड या ठिकाणी कार्यरत नसून ती फक्त कागदोपत्री चं दाखवण्याचा प्रयत्न आहे. सदरील संस्था हि दिलीप पारेकर यांची असुन याच ठिकाणी त्यांची अन्य अनधिकृत अमान्यता प्राप्त संस्था खोलेश्वर विद्यालय, दिंदूड आहे.

साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या नावाची लाज वाटते की काय अशा प्रकारची संस्थेची वागणूक दिसत आहे.जातिवादी मानसिकता असलेल्या मुख्याध्यापक व संस्थाचालकावर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करा. जसे की, विद्यार्थ्यांचे ओळखपत्र आण्णाभाऊ साठे इंग्लिश स्कूलचे न वापरता खोलेश्वर विद्यालयाचे वापरले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना ने-आण करण्यासाठी ज्या बसेस आहेत त्यांनाही आण्णाभाऊ साठे इंग्लिश





स्कुल नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव बसेसवर वापरले जाते. विद्यार्थ्यांच्या गणवेशावरही आण्णाभाऊ साठे असे नाव न वापरता खोलेश्वर विद्यालय असेच नाव व लोगो आहे.

सदरील परिस्थीती पाहता शाळेचे संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक हे जातीयवादी मानसिकतेचे आहेत काय? असा प्रश्न निर्माण होतो. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे नाव वापरण्यास यांना एवढी का लाज वाटावी ही गंभीर बाब आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद या संस्थाचालक व मुख्याध्यापकावर कारवाई व्हावी यासाठी गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्याकडून निवेदन देण्यात आले आहे.

# डॉ. अमोल मोहळकर यांनी योग्य उपचार केल्याने गाईला मिळाले जीवदान

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांचा कर्तव्य दृष्टिकोन पुन्हा एकदा समोर आला आहे. पाटोदा शहरातील शेतकरी महादेव जाधव यांच्या गाईचा पाय मोडल्याची दुर्दैवी घटना घडली ही घटना पाटोदा आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांना समजताच तात्काळ डॉक्टर मोळकर यांनी घटनास्थळी धाव घेत योग्य उपचार सुरू करून त्या गाईचे प्राण वाचवले. गाईच्या पायाच्या गंभीर जखमेवर डॉक्टर मोहळकर यांनी आपल्या सहकारी डॉ. हरिदास शेलार आणि डॉ. ओम गोरे यांना सोबत घेऊन शेतातच तातडीने शस्त्रक्रिया केली. अनेक तास सतत चाललेल्या उपचारांमुळे गाईची प्रकृती स्थिर झाली आणि तिचे प्राण वाचले. या मनोभावातून दिसून येते की डॉ. अमोल मोहळकर केवळ मानवतेसाठीच नव्हे, तर प्राण्यांप्रती असलेल्या प्रेमासाठीही नेहमी तत्पर असतात. शेतकरी महादेव जाधव यांनी या डॉक्टरांच्या संवेदनशीलतेचे व समर्पित प्रयत्नांचे कौतुक केले असून त्यांना मोठा आधार मिळाल्याचे सांगितले. पाटोदा तालुक्यातील ही घटना माणुसकीच्या नवीन परिभाषा मांडते. प्राण्यांच्या आरोग्यासाठी वेळ न घालवता तातडीने मदतीसाठी धावणाऱ्या डॉ. मोहळकर आणि त्यांच्या टीमचे शहरातील शेतकऱ्यांनी विशेष आभार मानले आहेत.ही घटना वैद्यकीय मदतीची तर आहेच, पण त्याहूनही अधिक माणुसकी आणि सहृदयतेची जिवंत साक्षी आहे, जी प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.



# उद्दिष्टपुर्ती पेक्षा जास्त वसुली करीत केज शहर पथकाचे यशस्वी नेतृत्व करत अभियंता सय्यद सह महावितरणच्या केज उपविभागाची उज्वल कामगिरी

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) केज उप विभागांतर्गत केज शहर कार्यालय पथक एक यांनी जुलै २०२५ मध्ये थकबाकी वसुलीत १०४ टक्के वसुलीचे उद्दिष्ट साध्य करत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कार्यकारी अभियंता सय्यद मिनाजोहीन यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पथक व इतर कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.




केज उपविभाग अंतर्गत एकूण ०६ पथक कार्यरत असून, त्यामधून केज शहर पथक-एकची सर्वाधिक वसुली झाली आहे. या पथकाचे जुलै महिन्याचे वसुलीचे उद्दिष्ट ०१ कोटी २८ लाख रुपये होते. मात्र,कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांच्या नियोजन बद्ध आणि जोमदार कामकाजामुळे थकबाकी व चालू बिले मिळून एकूण ०१ कोटी ३४ लाख थकीत विज बिल व माहे जुलै २०२५ चे डिमांड वसूली करण्यात आले. त्याच प्रमाणे अन्य पथकांची कामगिरीही उल्लेखनीय ठरली आहे. केज ग्रामीण पथक-एक ने ०१ कोटी २८ लाख च्या उद्दिष्टापैकी ०१ कोटी ३४ लाख रुपये वसूली केली आहे. युसुफवडगाव पथक उद्दिष्ट ३२ लाख होते त्यांनी वसुली २२ लाख वसुली केली आहे. बनसारोळा पथक यांना वसुलीचे उद्दिष्ट १७ लाख होते त्यांनी १५ लाख वसुली केली आहे. मस्साजोग पथक उद्दिष्ट २२ लाख रुपये होते. त्यांनी वसुली १३ लाख रुपये केली आहे.

नांदुरघाट पथकाला वसुलीचे उद्दिष्ट १८ लाख रुपये होते त्यांनी ११ लाख रुपये वसुली केली आहे. या संपूर्ण वसुली मोहीमेमुळे केज उपविभागाची एकूण वसुली ९० टक्के झाली आहे. या कामगिरीसाठी उप कार्यकारी अभियंता सय्यद मिनाजोद्दीन, कनिष्ठ अभियंता शितल सय्यद, सहाय्यक अभियंता हलगुडे, सहाय्यक अभियंता वैरागे, सहाय्यक अभियंता बोराटे मडम, कनिष्ठ अभियंता अंडील यांच्यासह मुख्य तंत्रज्ञ विष्णु तेलंग, गायकवाड, बनसोडे, डिकले, शिंदे, बडे, आजम, चौधरी, लामतुरे, केंद्रे मडम, सय्यद आक्रम, गालफाडे, रोहन सिरसट, बीलिंग सहाय्यक लेखा अधिकारी जोशी साहेब मुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. यामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. या यशस्वी वसुलीबद्दल कार्यकारी अभियंता सय्यद मिनाजोहीन यांनी सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक करत पुढील काळातही अशीच प्रेरणादायी कामगिरी करण्याचे आवाहन केले आहे.

# ना. पंकजाताई मुंडेंचे नाशकात दोन दिवस भरगच्च कार्यक्रम

## उद्योजक व प्रदुषण नियंत्रण मंडळाची बैठक; स्वसंवेद्या साधनापीठाचे भूमिपूजन, त्र्यंबकेश्वरांचेही घेतले दर्शन

**नाशिक । प्रतिनिधी**

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे काल व आज नाशिक दौऱ्यावर होत्या, दोन दिवस त्यांच्या दौर्याचा शेड्यूल प्रचंड व्यस्त होता. शासकीय बैठका, भेटीगाठी तसेच विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना त्यांनी हजेरी लावली. दरम्यान, उद्योजक आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या बैठकीत त्यांनी अधिकाऱ्यांना प्रदूषणा संदर्भात वेगवेगळ्या सूचना केल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी शुक्रवारी क्रेडाई नाशिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या एरॉनॉमिक्स २०२५ या कार्यक्रमास उपस्थित राहून संवाद साधला. त्यानंतर आ. सीमाताई हिरे यांचे घरी भेट, डॉ. अद्वैत दराडे यांच्या रूग्णालयाचे उदघाटन, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष रोहन कानकाटे, गिरीश पालवे, अजिंक्य साने यांच्या घरी भेट त्यांनी दिली.

**त्र्यंबकेश्वराचे दर्शन**

श्रावण महिन्याचे औचित्य साधून ना. पंकजाताई मुंडे यांनी या दौऱ्यात त्र्यंबकेश्वर मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेतले.




यावेळी भाजपचे पदाधिकारी त्यांच्यासमवेत उपस्थित होते. सिध्दिविनायक मानव कल्याण मिशनचे अध्यक्ष तुळशीराम महाराज गुट्टे यांच्या स्वसंवेद्या साधनापीठाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते पार पडले. ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक जिल्ह्यातील उद्योजक आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली. उद्योजकांच्या समस्या, प्रदूषण वाढीची कारणे आणि उपाययोजनासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, उद्योगाला जपून पर्यावरण रक्षण करायचे आहे. रेड झोनसारख्या वेगवेगळ्या झोनमध्ये प्रदूषण कमी करणे हे महत्वाचे काम आहे. आपण जेवढे पाणी वापरतो, त्यापैकी ४८ टक्के पाणी ट्रीट करतो. ५२ टक्के पाणी वाया जाते. पंतप्रधान मोदींच्या लक्षात आल्यानंतर नमामी गंगासारखे उपक्रम सुरू केले. तुम्ही उद्योग सुरू करतात, त्यामुळे तुम्हाला सर्व सुविधा पाहिजे ही अपेक्षा असते. उद्योग विभाग आणि पर्यावरण विभाग यांची जबाबदारी आहे. आधी जबाबदारी उद्योग विभागाची आहे, प्रदूषण झाल्यानंतर आमचे काम सुरू होते. प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी जे प्रकल्प उभे करायचे, त्यासाठी आम्ही मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करू असे त्यांनी म्हटले.

**मागे मी मंत्री झाले तेव्हा कुंभमेळा भरला, आता पुन्हा...**

ईडी वैगेरे कशा धाडी टाकतात, तशा प्रदूषण नियंत्रण मंडळाने एसटीपी प्लांट धाडी टाका, प्रक्रिया करून पाणी नदीत सोडले जाते की नाही ते बघण्याच्या सूचना पंकजाताई मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. सीएसआर फंडातून जसे मंदिर, शिक्षणासाठी पैसे उभे करतात, तसे तुम्ही पर्यावरणासाठी निधी उभा करावा. साधू-महंत जिथे डुबकी मरतील ते पाणी स्वच्छ असले पाहिजे. खूप लोक इथे कुंभमेळा काळात येतील. त्यामुळे स्वच्छतेसाठी शाश्वत उपाययोजना केल्या पाहिजेत. या कुंभमेळ्याला खूप लोक येतील. मागे मी मंत्री झाले तेव्हा कुंभमेळा भरला होता. आता पुन्हा मंत्री झाले आणि पुन्हा कुंभमेळा भरतोय, असे देखील पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT